# कोळसेवाडी वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना


पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/ २८२ /२०२५ दि.२५/१२/२०२५

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी, कोळसेवाडी** वाहतूक उपविभागाचे हद्दीत MMRDA तर्फे गवार कन्स्ट्रक्शन लिमीटेड यांचेकडुन कल्याण शिळ रोडवर पत्रीपुल ते रूणवाल चौक दरम्यान मेट्रो १२ ( कल्याण– तळोजा ) प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर सुरू असून, दिनांक २५/१२/२०२५ रोजी पासुन दिनांक ३१/१२/२०२५ रोजी पावेतो कल्याण शिळ रोडवर रुणवाल चौक ते डी.एन.एस. चौक **१) पीलर नं.२१५ ते पीलर नं.२२१, २) पीलर नं.१८९ ते पीलर नं.१९१ व ३) पीलर नं.१४७ ते पीलर नं.१४८ यावर** शिळफाटयाकडुन **कल्याणकडे येणाऱ्या वाहीनीवर मोठया क्रेनच्या साहाय्याने सिमेंट गर्डर ठेवण्याचे काम करण्यात येणार आहे.** सदर कालावधीत परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद –** | **१)** कल्याण शिळ रोडवरून कल्याण कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **रुणवाल चौक मेट्रो पीलर नं.२२१** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहतूक रुणवाल चौक येथून कल्याण कडुन येणाऱ्या वाहीनीवरुन मानपाडा चौक पावेतो ऐकेरी जावुन पुढे सततच्या वाहीनीवरुन इच्छीत स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | **२)** कल्याण शिळ रोडवरून कल्याण कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **मानपाडा चौक मेट्रो पीलर नं. २०१** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहतूक मानपाडा चौक पीलर नं. २०१ येथून डावीकडे वळण घेवून सर्विस रोडने सोनारपाडा चौक पर्यंत जावुन पुन्हा उजवीकडे वळण घेवुन कल्याण शिळ रोडवरून इच्छीत स्थळी जाईल. |
| **प्रवेश बंद –** | **३)** कल्याण शिळ रोडवरून कल्याण कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **सोनारपाडा चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहतूक सोनारपाडा चौक येथून डावीकडे वळण घेवून सर्विस रोडने डी.एन.एस.चौक पर्यंत जावुन मेट्रा पीलर नं.१४४ येथून पुन्हा उजवीकडे वळण घेवून कल्याण शिळ रोडवरून इच्छीत स्थळी जाईल. |

सदरची अधिसुचना **दिनांक २५/१२/२०२५ रोजी पासुन ते दिनांक ३१/१२/२०२५ रोजी पावेतो रात्रौ २३:५५ वा. ते सकाळी ०५:०० वा. पावेतो** अंमलात राहील.

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर
ठाणे पोलीस पत्रक.

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली, वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा.कल्याण–डोंबिवली च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.